# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ०७/०६/२०२४ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ६०७** **विषय क्रमांक- ६०७**

**दिनांक – ०७ /०६/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६०७ दिनांक - ०७/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. बक्षेका/स्था/५१/२०२४ दि.०७/०६/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालया मधील स्थापत्य विषयक व अनुषंगिक कामे करणे या कामाचा सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रकात समावेश करणेबाबत. |
| **ठराव क्र. ६०७ दिनांक - ०७/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. बक्षेका/स्था/५१/२०२४ दि.०७/०६/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.१७ मध्ये प्रेमलोक पार्क भागात पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय इमारत अस्तित्वात असून सदर इमारतीचे विस्तारीकरण व फर्निचर विषयक बाबींचे काम निविदा क्र ३०/२३-२४ अंतर्गत प्रगतीपथावर आहे. त्याअनुषंगाने सदर कामाची र.रू. २,६२,६९,८३४/- इतकी स्थापत्य व विद्युत विभागाची एकत्रित निविदा काढणेत आलेली आहे.<br>सदर कामास मा. महापालिका सभा ठराव क्र ३३७, दि. ०१/०६/२०२३ अन्वये सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात प्रशासकीय मान्यता र.रू. ३,५०,००,०००/- इतकी करण्यात आलेली होती. सदरचे कामास सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रकात र.रू.१०००/- तरतुद करणेत आली होती. तथापि सदर काम अंदाजपत्रकातून वगळले गेले आहे.<br>मा. आयुक्त सो यांचेकडील आदेश क्र भुजि/सर्व्हे-६/कावि/५२१/२०२४,दि. ०३/०४/२०२४ नुसार मौजे किवळे येथील आरक्षण क्र ४/१२४ (विभागीय कार्यालय) मधील पुर्ण झालेल्या इमारतीतील तळमजला आपला दवाखाना / नागरी सुविधा केंद्र करीता, पहिला मजला पोलीस उपायुक्त परिमंडळ २ करीता व दुसरा मजला कर आकारणी व करसंकलन विभागाचे किवळे विभागीय कार्यालयाकरीता, वाटप करण्याचे निश्चीत करण्यात आलेले आहे<br>त्याअनुषंगाने सदर ठिकाणचे दि. १५/०५/२०२४ चे प्राप्त नकाशानुसार आवश्यक स्थापत्य / फर्निचर विषयक व विद्युत विषयक कामे तसेच पोलिस आयुक्तालया चे मागणी व नकाशानुसार फर्निचर/ स्थापत्य विषयक बाबींचे कामे पुर्ण करणेसाठी एकुण र.रू ७,००,००,०००/- (अक्षरी- सात कोटी फक्त) इतकी सुधारीत प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. |

| | |
|---|---|
| | सदरचे काम सन २०२३-२४ चे मुळ अंदाजपत्रकात भांडवली कामे - इमारत योजना या लेखाशिर्षाअंतर्गत समाविष्ट असल्याने वरील विषयांकीत कामाची सुधारीत प्रशासकीय मान्यता सन २०२४-२५ मध्ये भांडवली कामे – इमारत योजना या लेखाशिर्षकांतर्गत समाविष्ट करणे उचित होईल. सदर कामासाठी आवश्यक तरतुद इतर कामाच्या तरतुदीतून वर्गीकरण करण्यात येईल.<br>मा. पोलीस आयुक्त व सल्लागार यांनी पोलीस आयुक्तालय इमारतीतील सुचविलेल्या स्थापत्य / फर्निचर बदलांचा अंतर्भाव करून तसेच मौजे किवळे येथील आरक्षण क्र ४/१२४ ( विभागीय कार्यालय) मधील पोलीस उपायुक्त परिमंडळ २ कार्यालय, किवळे करसंकलन, नागरी सुविधा केंद्र व आपला दवाखाना करीता आवश्यक स्थापत्य / फर्निचर व विद्युत विषयक कामे करणेकरीता मुळ निविदा रकमेव्यतिरिक्त अतिरिक्तखर्च होणार असल्याने तसेच<br><br>सदरचे काम प्रगतीपथापर असून तातडीने पुर्ण करावयाचे असलेने पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालया मधील स्थापत्य विषयक व अनुषंगिक कामे करणे या कामाचा सन २०२४-२५ च्या मुळ अंदाजपत्रकात भांडवली कामे – इमारत योजना या लेखाशिर्षकांतर्गत समावेश करून आवश्यक सुधारीत प्रशासकीय मान्यता र.रू. ७,००,००,०००/- या सुधारीत रक्कमेस प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक असलेने, त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.<br>. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ६०८** **विषय क्रमांक- ६०८**

**दिनांक – ०७ /०६/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६०८ दिनांक - ०७/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/५९०/२०२४ दि.०७/०६/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते स्वारगेट या मेट्रो लाईन – १ चे पिंपरी – निगडी मेट्रो लाईन १ ए चे विस्तारीत डीपीआर बाबत. |
| **ठराव क्र. ६०८ दिनांक - ०७/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील पत्र क्र.स्था/प्रकल्प/५९०/२०२४ दि.०७/०६/२०२४ अन्वये, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी संयुक्तपणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका ते स्वारगेट मेट्रो प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) DMRC दिल्ली यांचेकडून तयार करून त्यास राज्य शासनाची मान्यता घेवून केंद्र शासनाची अंतिम मंजुरी घेवून त्याची अंमलबजावणी मे. महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (SPV) यांचेमार्फत सुरू आहे. |

| | |
|---|---|
| | त्याच प्रमाणे पिंपरी ते निगडी हा ४.४१ कि.मी. लांबीचा मेट्रो लाईन-१ए चा विस्तारित मार्ग व त्यावरील ३ मेट्रो स्टेशन उभारणेचा डीपीआर मा. महापालिका सभेची मान्यता ठराव क्र.३३३ दि.२०/१२/२०१८ व महापालिका सभा क्र. ५८, ठराव क्र. ६४७ दि. २०/०५/२०२१ रोजी अन्वये मान्यता घेवून त्यास राज्य शासनाची व केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे.<br>तथापि, सदर मार्गिकेवर टिळक चौक, निगडी येथे अतिरीक्त मेट्रो स्टेशन उभारणेबाबत स्थानिक लोक प्रतिनिधींकडुन मनपा तसेच महामेट्रोकडे वेळोवेळी मागणी होत असले बाबत कळविले आहे. त्यास अंदाजे र.रु. ५० कोटी इतका खर्च असलेबाबत नमुद केले आहे.<br>त्यानुषंगाने महामेट्रोने सदर मेट्रो स्टेशन उभारणे आवश्यक असल्याने पिंपरी चिंचवड महानगरापालिकेस प्रस्ताव मान्य असलेस तत्वतः मान्यता देणेबाबत कळविले आहे. त्याकरीता मंजुरी मिळाले नंतर निधी उभारणीबाबत मनपा, राज्य शासन व केंद्र शासन यांचे मान्यतेप्रमाणे पुढील निर्णय अलाहीदा करणेत येईल. सदर टिळक चौक,निगडी येथे अतिरीक्त मेट्रो स्टेशन उभारणेबाबत तत्वतः मान्यतेची तातडी लक्षात घेवून मा.महापालिका सभेची मंजूरी घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ६०९** **विषय क्रमांक - ६०९**

**दिनांक – ०७ /०६/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६०९ दिनांक - ०७/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील पत्र क्र. बक्षेका/पापु/२/कावि/८३/२०२४ दि.०७/०६/२०२४ अन्वये, पवना धरणातून से.क्र. २३ जलशुध्दीकरण केंद्र निगडी पर्यंत पाणी आणणे साठी थेट पाईप लाईन टाकणे " च्या कामामधील जागा भाडे व सुरक्षा रक्षकांचे बिलाचे एकुण सुधारीत रक्कमेस मान्यता देणेबाबत. |
| **ठराव क्र. ६०९ दिनांक - ०७/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील पत्र क्र. बक्षेका/पापु/२/कावि/८३/२०२४ दि.०७/०६/२०२४ अन्वये, पवना थेट पाईप लाईन प्रकल्पामधील आणलेले साहित्य ठेवणेसाठी संबंधित कामाचे ठेकेदार यांनी जागा भाड्याने घेतलेल्या आहेत. तसेच सदर साहित्यांचे रक्षण करणेसाठी सुरक्षा रक्षक ठेकेदाराची नेमणूक करणेत आली आहे. सदर जागेचे भाडे व सुरक्षा रक्षकांची देयके देणे बाबत संबंधित कामाचे ठेकेदार, जागा मालक तसेच सुरक्षा रक्षक ठेकेदार मागणी करीत आहेत. त्या अनुषंगाने दि. १७/०८/२०२३ रोजी स.११.०० वा. अति आयुक्त (१) दालन, ४ था मजला, महापालिका भवन येथे बैठक झाली आहे. सदर बैठकीमध्ये जागा मालकांचे भाडे व सुरक्षा रक्षकांचे देयक मे २०१९ पासुन पुढे प्रत्यक्ष पाईप्स व इतर सामुग्री |

| | |
|---|---|
| | स्थलांतरीत होई पर्यंत करारनाम्यातील दराप्रमाणे पवना थेट पाईप लाईन प्रकल्पाचे ठेकेदार मे.एनसीसी-एसएमसी-इंदू (जेव्ही) यांना अदा करणेत यावे असे ठरले आहे. त्या अनुषंगाने संबंधित ठेकेदार यांना जागा मालकांसोबत झालेल्या करारानुसार १ मे २०१९ ते ३० जुन २०२४ या कालवधीतील भुई भाडे र.रू. ७,०५,४९,८०२/- + GST व सुरक्षा रक्षक देयक र.रू.१,५५,७६,०००/- + GST येवढे देयक येत असुन एकत्रितपणे र.रू. ८,६१,२५,८०२/- + GST च्या खर्चास सदरचा विषय मा. महापालिका सभा समितीमध्ये दि.१७/०८/२०२३ रोजीच्या सभावृत्तांतानुसार ठेवावयाचा आहे. तसेच सदरची बाब अतिरिक्त बाब म्हणून मंजूर करणे व मोजमाप पुस्तकात नोंद घेण्यासाठी दि.३१/१२/२०२४ रोजी पर्यंत मुदतवाढ देणेकामी मा.महापालिका सभेची मंजूरी घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ६१०** **विषय क्रमांक - ६१०**

**दिनांक – ०७ /०६/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६१०<br>दिनांक -<br>०७/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील पत्र क्र.बक्षे/स्था/कावि/०९/५३/२०२४ दिनांक - ०६/०६/२०२४ अन्वये, “चिंचवड येथील तालेरा रुग्णालय येथे बर्न (जळीत) रुग्णांसाठी अद्यावत बर्न वॉर्ड संबधित कामे करणे.” या कामाचा सन २०२४-२५ च्या मूळ अंदाजपत्रकामध्ये समावेश करणेबाबत. |
| **ठराव क्र. ६१०<br>दिनांक -<br>०७/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील पत्र क्र.बक्षे/स्था/कावि/०९/५३/२०२४ दिनांक - ०६/०६/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमधील मनपा रुग्णालयामध्ये जळीत रुग्णांसाठीच्या उपचारासाठी वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसल्याने पिंपरी चिंचवड शहरातील जळीत रुग्णांना तातडीने उपचार करणे शक्य होत नाही. त्यामुळे जळीत रुग्णांना ससून हॉस्पिटल, पुणे येथे उपचारासाठी पाठवावे लागते. जळीत रुग्णांना तात्काळ उपचार मिळावेत म्हणून पिंपरी चिंचवड मनपा रुग्णालयात सदर रुग्णांसाठी बर्न वार्ड करणेबाबत मोठ्या प्रमाणात मागणी होत आहे. त्याबाबत अनेक वेळा वर्तमानपत्रामध्ये बातमी प्रसिद्ध झालेली आहे. जळीत रुग्णांना तातडीने उपचार मिळावेत म्हणून पिंपरी चिंचवड शहरातील रूग्णालयात अद्यावत बर्न वॉर्ड करणे आवश्यक आहे. त्याबाबत मा. आयुक्त, मुख्य वैद्यकीय अधिकारी, सह शहर अभियंता (स्थापत्य) यांनी संयुक्त |

पाहणी करून चिंचवड येथील तालेरा रुग्णालय येथे बर्न वार्डची निर्मिती करणेबाबतचा निर्णय झालेला आहे.

“चिंचवड येथील तालेरा रुग्णालय येथे बर्न (जळीत) रुग्णांसाठी अद्यावत बर्न वार्ड संबधित कामे करणे”. या कामाचे नाव सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकामध्ये समाविष्ठ नसल्याने सदर कामाचा सन २०२४-२५ च्या मनपा अंदाजपत्रकामध्ये “विशेष योजना.” अंतर्गत व्हिजन २०२५ या लेखाशीर्ष अंतर्गत सामावेश करणे आवश्यक आहे. तसेच सदर कामास अंदाजपत्रकीय र.रु. ३.०० कोटी इतकी प्रशासकीय मान्यता व र.रु. ५०.०० लक्ष इतकी तरतूद सन २०२४-२५ च्याअंदाजपत्रकामध्ये प्रस्तावित करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी आवश्यक तरतूद खालील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे इतर कामातील शिल्लक तरतुदीमधून वर्गीकरण करून उपलब्ध करणेत येईल.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | पान क्र./ अनु. क्र. | कामाचे नाव | सन २०२४-२५ मधील उपलब्ध तरतूद र.रु. | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष योजना (७)व्हीजन २०२५ | | क्रांतीवीर चापेकर वाड्याच्या तिस-या टप्प्याची कामे करणे (भाग - ३) | ४,००,००,०००/- | ० | ५०,००,०००/- |
| २ | विशेष योजना (७)व्हीजन २०२५ | - | चिंचवड येथील तालेरा रुग्णालय येथे बर्न (जळीत) रुग्णांसाठी अद्यावत बर्न वॉर्ड संबधित कामे करणे | ० | ५०,००,०००/- | ० |
| | | | एकूण | ० | ५०,००,०००/- | ५०,००,०००/- |

सबब “चिंचवड येथील तालेरा रुग्णालय येथे बर्न (जळीत) रुग्णांसाठी अद्यावत बर्न वार्ड संबधित कामे करणे.” या कामाचे नाव सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकामध्ये “विशेष योजना.” अंतर्गत व्हिजन २०२५ या लेखाशीर्ष अंतर्गत नव्याने समाविष्ठ करून अंदाजपत्रकीय र.रु. ३.०० कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता व वरील तक्त्यात नमुद केलेप्रमाणे र.रु. ५०.०० लक्ष इतकी तरतूद सन २०२४-२५ चे मनपा अंदाजपत्रकामधून वर्गीकरण करणेस.

| | |
|---|---|
| | मा.महापालिका सभेची मंजूरी घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ६११** **विषय क्रमांक - ६११**

**दिनांक – ०७ /०६/२०२४** **खाते-मा.आयुक**

| | |
|---|---|
| **विषय क्र. ६११ दिनांक - ०७/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील पत्र क्र.क्रीडा/६/कावि/५१८/२०२४ दिनांक - ०७/०६/२०२४ अन्वये, कासारवाडी येथील स्व. पै. श्री. राजाराम लांडे क्रिडा संकुल येथील योगा हॉल, कबडडी ग्राऊंड ११ महिने कराराने चलाविण्यास देणे बाबत. |
| **ठराव क्र. ६११ दिनांक - ०७/०६/२०२४** | मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील पत्र क्र.क्रीडा/६/कावि/५१८/२०२४ दिनांक - ०७/०६/२०२४ अन्वये, स्व. पै. श्री. राजाराम लांडे क्रीडा संकुल, कासारवाडी हे जय महाराष्ट्र व्यायाम मंडळ (ट्रस्ट), कासारवाडी यांना, योगा हॉल, कबडडी ग्राऊंड, आणि अत्याधुनिक व्यायामशाळासकाळी ६ ते ८ व सांय ५.३० ते ८ क्रीडा धोरणातील अटी शर्ती नुसारमोफत ११ महिने कराराने चलाविण्यास देणेस तसेच तेथील बॅडमिंटन हॉल म.न.पा क्रीडा धोरणातील अटी शर्ती नुसार भाडे आकारून११ महिने कराराने चालविण्यास देणे आवश्यक असल्याने श्री. संजय दिनकर कुंदर, अध्यक्ष जय महाराष्ट्र व्यायाम मंडळ (ट्रस्ट) यांनी देखील स्व. पै. श्री. राजाराम लांडे क्रिडा संकुल, कासारवाडी येथील बॅडमिंटन हॉल, योगा हॉल, कबडडी ग्राऊंड, आणि अत्याधुनिक व्यायामशाळा सकाळी ६ ते ८ व सांयकाळी ५.३० ते ८ या वेळेत पालिकेच्या सर्व अटी व शर्तीनुसार चालविण्यास देणेबाबत कळविले आहे.<br>जय महाराष्ट्र व्यायाम मंडळ (ट्रस्ट), कासारवाडी यांना स्व. पै. श्री. राजाराम लांडे क्रीडा संकुल, कासारवाडी यांना बॅडमिंटन हॉल, योगा हॉल व अत्याधुनिक व्यायाम शाळा (GYM), कब्बडी ग्राऊंड हे ११ महिने कराराने देणेकामी म.न.पा क्रीडा धोरणातील अटी शर्ती नुसार संस्थेशी करारनामा करून चालविण्यास देता येणे शक्य आहे. तरी स्व. पै. श्री. राजाराम लांडे क्रीडा संकुल, कासारवाडी हे जय महाराष्ट्र व्यायाम मंडळ (ट्रस्ट), कासारवाडी यांना योगा हॉल, कबडडी ग्राऊंड, आणि अत्याधुनिक व्यायामशाळासकाळी ६ ते ८ व सांय ५.३० ते ८ क्रीडा धोरणातील अटी शर्ती नुसार मोफत ११ महिने कराराने चलाविण्यास देणेस |

| | |
|---|---|
| | तसेच तेथील बॅडमिंटन हॉल म.न.पा क्रीडा धोरणातील अटी शर्ती नुसार भाडे आकारून ११ महिने कराराने चालविण्यास देणेस, मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक असल्याने त्यास मा.महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय:** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**